EAU/ICD/2021-22/253
22/10/2021

मसुदा
क्र.६/२०२१—२०२२

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२०२२ मधील २७ सप्टेंबर, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२१-२२ मधील सहावी सभा **सोमवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता** आयेजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा आभासी पध्दतीने घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४ | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १३ | डॉ. सोनाली रोडे, (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग) | सदस्य |
| १४. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १५. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १६. | डॉ.(सी.ए.) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत :-**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**अनुपस्थिती :-**

डॉ. वैभव नरवडे यांनी अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

श्रध्दांजली :-

**श्रीमती. जगजित कौर**

ज्येष्ठ गायिका तसेच संगीतकार खय्याम यांच्या पत्नी श्रीमती. जगजित कौर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९३ वर्षांच्या होत्या.

**श्री. कल्याण सिंह**

उत्तरप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते श्री. कल्याण सिंह यांचे दिर्घ आजाराने दिनांक २१ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

**सय्यद हकिम**

भारताचे माजी फुटबॉलपटू सय्यम हकिम यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २२ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**श्री. चंद्रकांत महामिने**

विनोद साहित्य निर्मति ज्येष्ठ साहित्यिक श्री. चंद्रकांत महामिने यांचे वृध्दपकाळाने दिनांक २२ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**डॉ. गेल ऑम्वेट तथा शलाका पाटणकर**

ज्येष्ठ समाजशास्त्र, श्रामिक मुक्ती दलाच्या संस्थापक सदस्या डॉ. गेल ऑम्वेट तथा शलाका पाटणकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक २५ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या.

**श्री. बी. व्ही. निंबकर**

फलटणमधील प्रसिध्द निंबकर ॲग्रीकल्चर रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, कृषी संशोधक, पद्मश्री श्री. बी. व्ही. निंबकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक २५ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**श्री. अप्पालाल शेख**

राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता, महाराष्ट्र केसरी श्री अप्पालाल शेख यांचे अल्पशा आजाराने दिनांक २६ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५५ वर्षांचे होते.

**श्री. प्रतापराव ऊर्फे आबासाहेब तोरसकर**

दि बांदा नवभारत शिक्षण प्रसारक मंडळाचे (ट्रस्ट) अध्यक्ष श्री. प्रतापराव ऊर्फ आबासाहेब यांचे दिर्घ आजाराने दिनांक २६ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

**श्री. संतोष दसपुते**

माजी आमदार ॲड. संतोष दसपुते यांचे अल्पशा आजाराने दिनांक २६ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

### श्री. आनंद अंतरकर

हंस, मोहिनी व नवल या मासिकांचे संपादक आणि लेखक श्री. आनंद अंतरकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २८ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

### श्री. रॉबी डिसिल्वा

भारतातील पहिले जागतिक कीर्तीचे चित्रकार - डिझायनर श्री. रॉबी डिसिल्वा यांचे दिर्घ आजाराने दिनांक २८ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

### श्री. जयंत पवार

ज्येष्ठ पत्रकार, नाटककार, नाटय समीक्षक श्री. जयंत पवार यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१ वर्षांचे होते.

### श्री. सदाशिव साठे

कल्याण येथील आंतरराष्ट्रीय किर्तीचे ज्येष्ठ शिल्पकार श्री सदाशिव उर्फ भाऊ साठे यांचे वृध्दपकाळाने दिनांक ३० ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षांचे होते.

### श्री. वासू परांजपे

मुंबई क्रिकेटचे द्रोणाचार्य अशी ओळख आपल्या कार्यामुळे मिळवणारे माजी क्रिकेटपटू श्री. वासू परांजपे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३० ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

### श्री. सुनील यादव

भाजपचे अंधेरी पूर्व येथील नगरसेवक श्री सुनील यादव यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५१ वर्षांचे होते.

### श्री. चंदन मित्रा

ज्येष्ठ पत्रकार आणि राज्यसभेचे माजी खासदार श्री चंदन मित्रा यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५१ वर्षांचे होते.

### श्री. सिध्दार्थ शुक्ला

लोकप्रिय अभिनेता श्री. सिध्दार्थ शुक्ला यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०२ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४० वर्षांचे होते.

### डॉ. त्रि. ना. धर्मधिकारी

ज्येष्ठ संस्कृतज्ञ आणि वैदिक संशोधन मंडळाचे माजी सचिव डॉ. त्रि. ना. धर्मधिकारी यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०३ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### श्रीमती. अरूणा भाटीया

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार यांच्या मातोश्री श्रीमती. अरूणा भाटीया यांचे वृध्दपकाळाने दिनांक ०८ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७८ वर्षांच्या होत्या.

**श्री. शरद भाटे**

ज्येष्ठ करसल्लागार श्री. शरद भाटे यांचे वृध्दपकाळाने दिनांक ११ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

**श्री. केसरीनाथ पाटील**

वरळी कोळीवाडयातील समाजसेवक व साने गुरूजी कथामालेचे दीपस्तंभ श्री केसरीनाथ पाटील यांचे दिर्घ आजाराने दिनांक १२ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**श्री. ऑस्कर फर्नांडिस**

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री श्री ऑस्कर फर्नांडिस यांचे दिर्घ आजाराने दिनांक १३ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**श्री. प्रकाश येवारे**

ज्येष्ठ गायक संगीतकार श्री. प्रकाश येवारे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५० वर्षांचे होते.

**श्रीमती. आशा गांधी**

राष्ट्र सेवा दलाच्या तसेच शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्या श्रीमती आशा गांधी यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या.

**प्रा. टी. पद्यनाभन**

जागतिक ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ प्रा. थानू पद्यनाभन यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १७ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६४ वर्षांचे होते.

**श्री. सिताराम काकतकर**

ज्येष्ठ किर्तनकार व शास्त्रीय गायक श्री. सिताराम काकतकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक १७ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

**श्री. शरद रणपिसे**

कॉंग्रसचे ज्येष्ठ नेते आमदार श्री. शदर रणपिसे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते.

सभेच्या सुरवातीला मा. कुलगुरूंनी, व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सदस्यांनी NAAC समिती भेटीदरम्यान दिलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दि. १२ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | दि. १२ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. २ | व्यवस्थापन परिषद दिनांक १३ ऑगस्ट, २०२०, २९ सप्टेंबर, २०२०, ६ नोव्हेंबर, २०२०, १ मार्च, २०२१ आणि २५ मार्च, २०२१ चे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर. | का.प्रा.वि. |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक १३ ऑगस्ट, २०२०, २९ सप्टेंबर, २०२०, ६ नोव्हेंबर, २०२०, १ मार्च, २०२१ आणि २५ मार्च, २०२१ च्या कार्यवाही अहवालांची नोंद घेण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | अधिसभेमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाकरीता प्राप्त उत्तरांचा मसुदा २०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ४ कलम ६ (१३) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | का.प्रा.वि. |
| **ठराव** | सदर बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांचा उत्तरामध्ये समावेश करुन प्रश्नांची उत्तरे तयार करण्यात आली. अधिसभेत व्यवस्थापन परिषदेत सदस्यांनी खालील नमुद केल्याप्रमाणे प्रश्नांना उत्तरे द्यावीत, असे ठरले. | |

| अ. क्र. | प्रश्न विचारणारे सदस्य | उत्तर देणारे सदस्य |
|---|---|---|
| १. | डॉ. चंद्रकांत कुलकर्णी प्र.क्र.१ | प्रा. अजय भामरे |
| | प्र.क्र.२ | प्रा. प्र-कुलगुरू |
| | प्र.क्र.३ | प्रा. अजय भामरे |
| २. | डॉ. आरती प्रसाद प्र.क्र.१ | प्रा. प्र-कुलगुरू |
| | प्र.क्र.२ | प्रा. प्र-कुलगुरू |
| | प्र.क्र.३ | प्रा. अजय भामरे |
| ३. | डॉ.अनुजा पळसुले-देसाई प्र.क्र.१ | प्रा. प्र-कुलगुरू |
| | प्र.क्र.२ | प्रा. प्र-कुलगुरू |
| ४. | प्रा. धनाजी गुरव प्र.क्र.१ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | प्र.क्र.२ | डॉ. अनुराधा मजुमदार |
| ५. | श्री. साहेबराव घुले प्र.क्र.१ | प्रा. प्र-कुलगुरू |
| | प्र.क्र.२ | प्रा. प्र-कुलगुरू |
| ६. | श्रीमती शितल देवरुखकरप्र.क्र.१ | वित्त व लेखा अधिकारी |
| | प्र.क्र.२ | श्री. प्रदिप सावंत |
| | प्र.क्र.३ | वित्त व लेखा अधिकारी |
| ७. | प्राचार्य महादप्पा गोंडा प्र.क्र.१ | प्र-कुलगुरू |
| | प्र.क्र.२ | ॲड. निल हेळेकर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्र.क्र.३ | डॉ. राजेश खरात |
| ८. | ॲड. निल हेळेकर | प्र.क्र.१ | प्रा. महादाप्पा गोंडा |
| | | प्र.क्र.२ | प्रा. अनुराधा मजुमदार |
| | | प्र.क्र.३ | वित्त व लेखा अधिकारी |
| ९. | प्रा. सुभाष वाघमारे | प्र.क्र.१ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | | प्र.क्र.२ | डॉ. वैभव नरवडे |
| | | प्र.क्र.३ | डॉ. राजेश खरात |
| १०. | प्रा. विठ्ठल रोकडे | प्र.क्र.१ | |
| | | प्र.क्र.२ | ॲड. निल हेळेकर |
| | | प्र.क्र.३ | |
| ११. | डॉ. आनंत लोखंडे | प्र.क्र.१ | प्रा. अजय भामरे |
| | | प्र.क्र.२ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | | प्र.क्र.३ | प्रा. अजय भामरे |
| १२. | प्रा. प्रकाश दातार | प्र.क्र.१ | प्रा. अजय भामरे |
| | | प्र.क्र.२ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | | प्र.क्र.३ | प्रा. अजय भामरे |
| १३. | डॉ. गुलाबराव राजे | प्र.क्र.१ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | | प्र.क्र.२ | प्रा. अजय भामरे |
| | | प्र.क्र.३ | कुलसचिव (प्रभारी) |
| १४ | डॉ. निशा मुनी | प्र.क्र.१ | श्री. राजन कोळंबेकर |
| | | प्र.क्र.२ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| १५. | डॉ.धनराज कोहचाडे | प्र.क्र.२ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | | प्र.क्र.३ | प्रा. सुभाष वाघमारे |
| १६. | डॉ. रविंद्रनाथ रसाळ | प्र.क्र.१ | संचालक, परीक्षा व मु. मं. |
| | | प्र.क्र.२ | डॉ. रविकांत सांगुर्डे |
| | | प्र.क्र.३ | प्रा. महादाप्पा गोंडा |
| १७. | डॉ. सुरेश मैंद | प्र.क्र.१ | वित्त व लेखा अधिकारी |
| १८. | डॉ. संगिता पवार | प्र.क्र.१ | प्रा. अजय भामरे |
| | | प्र.क्र.२ | प्र-कुलगुरू |
| | | प्र.क्र.३ | डॉ. रविकांत सांगुर्डे |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | श्री. सुधाकर तांबोळी | प्र.क्र.१ | वित्त व लेखा अधिकारी |
| | | प्र.क्र.२ | वित्त व लेखा अधिकारी |
| | | प्र.क्र.३ | वित्त व लेखा अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ४ | विद्यापीठ वर्षवृत्त २०१९-२० च्या मसुदयास व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळणेबाबत. | प्रकाशन विभाग |
| ठराव | महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३६ (१) (२) प्रमाणे अधिष्ठाता मंडळाने तयार केलेला विद्यापीठाच्या महाविद्यालये व परिसंस्था, प्रशासकीय विकास विषयक उपक्रम इत्यादींचा अहवाल बनवून तो व्यवस्थापन परिषद व अधिसभेच्या मंजुरीनंतर शासनास व मा. कुलपतींना पाठविण्यात येतो. त्यानुसार सन २०१९-२० चा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीसाठी सादर केला असता सर्वानुमते तो स्विकारण्यात आला व अधिसभेपुढे मान्येतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले. तव्द्तच उपरोक्त वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी प्राचार्य डॉ. अजय भामरे, प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांना नामनिर्देशित करण्यात आले. | |
| बाब क्र. ५ | विद्यापीठाच्या सनदी लेखापरिक्षकांची (Statutory Auditor) आर्थिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ तसेच विद्यापीठाच्या अंतर्गत हिशेब तपासनीसांची (Internal Auditor) आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ करिता नेमणूक करण्याबाबत. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३५ (२) नुसार सन २०२०-२१ व २०२१-२२ हया वित्तिय वर्षांसाठी तसेच त्यापुर्वीच्या अपूर्ण राहिलेल्या संविधानिक लेखापरिक्षणाच्या कामासाठी संबंधित वित्तिय वर्षांसाठी संविधानिक लेखापरिक्षकांची, (Statutory Auditor) तसेच विद्यापीठाच्या अंतर्गत हिशोब तपासनीसांची (Internal Auditor) आर्थिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ करिता नेमणूक करण्याचे व त्यांचे मानधन | |

| | | |
|---|---|---|
| | ठरविण्याचे योग्य त्या अटी शर्तीसह पुर्ण अधिकार एकमताने मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br>सदर बाबतची अंमलबजावणी तातडीने करण्यासाठी सदर ठरावास त्याच सभेत मंजूरी देण्यात आली. | |
| बाब क्र. ६ | विद्या परिषदेच्या दिनांक २९ जून, २०२१ रोजीच्यो आभासी सभेमधील बाब क.- ६.४२ (N) अन्वये पारित केलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | विद्याविषयक प्राधिकरणे, बैठका आणि सेवा विभाग |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक २९ जून, २०२१ रोजीच्या आभासी सभेमधील बाब क.- ६.४२ (N) अन्वये पारित केलेल्या ठरावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ७ | देणगीदार डॉ. (श्रीमती) साधना ज. कामतकर यांनी एम एस्सी पदवी परीक्षेत "कम्प्युटर सायन्स" या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस दिवंगत सुहास गणेश मुळे यांच्या नावे पारितोषिक देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव. | शिष्यवृत्ती विभाग |
| ठराव | देणगीदार डॉ. (श्रीमती) साधना ज. कामतकर यांनी एम एस्सी पदवी परीक्षेत "कम्प्युटर सायन्स" या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस दिवंगत सुहास गणेश मुळे यांच्या नावे पारितोषिक देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. | |
| बाब क्र. ८ | युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार पी. एचडी. प्रवेश परीक्षा (PET) घेण्याबाबत. | संशोधन, प्रशासन आणि विस्तार विभाग |
| ठराव | सभागृहात सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा झाली. डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी पी. एचडी. साठी मार्गदर्शकांच्या असणा-या कमतरतेबाबतचा मुद्दा उपस्थित केला. त्या अनुषंगाने मा. अध्यक्ष यांनी प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली चार अधिष्ठातांची समिती गठीत करून त्यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर संशोधक मार्गदर्शक/प्राध्यापक, Prof. Emiratus इत्यादी यांना पी.एचडी. साठी मार्गदर्शक म्हणून कशा पध्दतीने घेता येईल त्याबाबतचे निकष ठरविण्यासाठी एक नियमावली तयार करावी, ती सर्व प्राधिकरणांमधून | |

| | | |
|---|---|---|
| | मंजूर करून घ्यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच या समितीकडे RRC आणि प्रबंध विभागाची कार्यपध्दती सुलभ व सोपी करण्याबाबतच्या सूचना देण्याचीही जबाबदारी देण्यात आली व लवकरात लवकर त्यांनी अहवाल सादर करावा असे ठरले. तसेच युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार पी. एचडी. प्रवेश परीक्षा (PET) घेण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ९ | Permission to allot place for construction of boys and Girls Hostel in Thane, Talere and Ambadave under PMJVK Scheme. | पा. सु. नि. अं. व देखभाल विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. कुलसचिवांनी सांगितले की, सदर वसतीगृहासाठी RUSA कडून अनुदान मिळणार आहे. चर्चेदरम्यान सदर वसतीगृह अद्यायावत व आंतरराष्ट्रीय गुणवत्तेचे बांधले जावे अशी सर्वांनी अपेक्षा व्यक्त केली. मा. कुलगुरूंनी सांगितले की, भविष्यात विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या वाढणा-या संख्येच्या अनुषंगाने या वसतीगृहांची मांडणी केली जाईल व ही सर्व वसतीगृहे विद्यापीठाच्या अखत्यारीत राहतील याची दक्षता घेऊन योजना केली जाईल. सर्वानुमते PMJVK योजने अंतर्गत मुले व मुलींसाठी वसतीगृह बांधण्यासाठी ठाणे उपपरिसर, तळेरे आणि आंबडवे येथे जागा देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १० | Item for change in nomenclature & ordinance number as per UGC nomenclature rules which is resolved in the A.C. meeting dated 23/02/2021, is placed before M.C. for its approval. | GICED |
| ठराव | It was resolved that the item for change in nomenclature & ordinance number as per UGC nomenclature rules which is resolved in the A.C. meeting dated 23/02/2021 be accepted.<br><br>Arising out of discussion, it was unanimously resolved that henceforth for GICED and for any other Institution, before signing the MOU, University Committee will visit personally to the place of Institution for inspection, Submit its report to University and then only the final decision will be taken. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ११ | Proposal received from the Director, Mahatma Education Society's Pillai HOC College of Engineering & Technology, Pillai HOCL Educational Campus, HOC Colony, Rasayani, Via Panvel, Dist. Raigad- 410207 requesting to issue "No Objection Certificate for Merging of Institutions Pillai HOC College of Engineering & Technology and Pillai HOC Polytechnic, running under the purview of Mahatma Education Society at Pillai HOCL Educational Campus, Rasayani from A.Y. 2021-22. | महाविद्यालय मान्यता आणि विकास विभाग |
| ठराव | It was resolved that the proposal received from the Director, Mahatma Education Society's Pillai HOC College of Engineering & Technology, Pillai HOCL Educational Campus, HOC Colony, Rasayani, Via Panvel, Dist. Raigad-410 207 requesting to issue "No Objection Certificate" for Merging of Institutions Pillai HOC College of Engineering & Technology and Pillai HOC Polytechnic, running under the purview of Mahatma Education Society at Pillai HOCL Educational Campus, Rasayani from A.Y. 2021-22 be accepted. | |
| बाब क्र. १२ | महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटीचे आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयास मौजे घाणेखुंटे-लोटे, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत. | महाविद्यालय मान्यता आणि विकास विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सभासदांच्या विविध शंकांना मा. प्र-कुलगुरूंनी समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर सर्वानुमते असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटीचे आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयास मौजे घाणेखुंटे -लोटे, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात यावी. | |
| बाब क्र. १३ | बाल भारतीचे मगनमल जे. पंचोलिया वाणिज्य महाविद्यालयाच्या भ्रष्ट कारभाराविरोधात तक्रारीचा अहवाल तसेच महाविद्यालयाचा खुलासा विचारार्थ सादर. | महाविद्यालय मान्यता आणि विकास विभाग |
| ठराव | बाल भारतीचे मगनमल जे. पंचोलिया वाणिज्य महाविद्यालयाच्या भ्रष्ट कारभाराबाबत गठीत करण्यात आलेल्या डॉ. रविंद्र देशमुख समितीचा अहवाल व अहवालातील शिफारशींनुसार विद्यापीठ या | |

| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालयाविरूध्द काय कारवाई करू शकते, या बाबतच्या कायदेशीर सल्ल्यासाठी विधी तज्ञांकडे पाठवावा व त्यांचा अभिप्राय पुढील व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावा व त्यानंतर महाविद्यालयावर करावयाच्या कारवाईचा निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.<br>चर्चेदरम्यान असाही ठराव करण्यात आला की, सर्व महाविद्यालयांना त्यांच्या व्यवस्थापन मंडळाची धर्मादाय आयुक्तांकडून मान्य झालेली नावे विद्यापीठास कळविण्याबाबत एक परिपत्रक पाठवावे व विद्यापीठाने गरज वाटल्यास प्राप्त नावे धर्मदाय आयुक्तांकडून पडताळणी करून घ्यावीत. | |
| बाब क्र. १४ | Governing structure for Autonomous University Departments, Centers, Schools and Institutes. | AAQA |
| ठराव | It was resolved that the Governing structure for Autonomous University Departments, Centers, Schools and Institutes be accepted and the same be recommended to the Senate. | |
| बाब क्र. १५ | Statutes for appointment of Head/Director of University Departments, Centers, Schools and Institutes. | AAQA |
| ठराव | It was resolved that the Statutes for appointment of Head/Director of University Departments, Centers, Schools and Institutes be accepted and the same be recommended to the Senate. | |
| बाब क्र. १६ | विद्यानगरी परिसरातील मोकळया जागेत माहे नोव्हेंबर, २०२१ ते जून, २०२२ (०८ महिने) या कालावधीत फिचर फिल्म (Feature Film) चे चित्रिकरण करण्याबाबत विद्यानगरी परिसरातील वापरात नसलेली ५ एकर जागा उपलब्ध करून देण्याबाबत. | सामान्य प्रशासन विभाग, फोर्ट |
| ठराव | विद्यानगरी परिसरातील मोकळया जागेत फिचर फिल्म (Feature Film) चे चित्रिकरण करण्याबाबत विद्यानगरी परिसरातील वापरात नसलेली ५ एकर जागा उपलब्ध करून देण्याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा झाली. त्यानुसार विद्यापीठाची जागा भाडयाने देताना किती भाडे आकारण्यात यावे, तात्पुरते स्ट्रक्चर बांधावे व ते नंतर काढावे, वेळेत जागा हस्तांतर करावी अन्यथा दंड आकारावा, इत्यादी बाबी करारनाम्यात असाव्यात, करारनाम्यातील अटी व शर्ती संदर्भात | |

| | | |
|---|---|---|
| | नियमावली तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| बाब क्र. १७ | M.Sc. in Agri Business Management अभ्यासक्रमाच्या Title of Course मध्ये दुरूस्ती करून M.Com. (Agri Business Management) करण्याबाबत. | GICED |
| ठराव | M.Sc. in Agri Business Management अभ्यासक्रमाच्या Title of Course मध्ये दुरूस्ती करून M.Com. (Agri Business Management) करण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. १८ | गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेच्या अभ्यासक्रमाच्या Title of Course मध्ये दुरूस्ती करण्याबाबत. | GICED |
| ठराव | गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेच्या अभ्यासक्रमाच्या Title of Course मध्ये दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात आली. | |
| | **आयत्यावेळी आलेली बाब** | |
| बाब क्र. १९ | The Establishment of a "Centre for Excellenece in Theoretical and Comuputational Sciences" at the University of Mumbai. | AAQA |
| ठराव | It was resolved that the Establishment of a "Centre for Excellenece in Theoretical and Comuputational Sciences" at the University of Mumbai be accepted. | |
| बाब क्र. २० | Statutes for unfairmeans in Examination. | परीक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ठराव | It was resolved that the Statutes for unfairmeans in Examination be accepted and the same be recommended to the Senate. | |
| | **चर्चेच्या अनुषंगाने पारीत झालेले ठराव** | |
| बाब क्र. २१ | व्यवस्थापन परिषदेच्या सभेत श्रध्दांजलीसाठी विविध व्यक्तींची नावे नमुद करण्याबाबत. | जनसंपर्क विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या सुरूवातीस नमूद करण्यात येत असलेल्या श्रध्दांजलीच्या नावांबाबत सर्वानुमते असा ठराव करण्यात आला की, यापुढे केंद्रिय पातळीवरील थोर व्यक्ती, महाराष्ट्राशी निगडीत थोर व्यक्ती व विद्यापीठाशी निगडीत व्यक्तींचाच उल्लेख | |

| | | |
|---|---|---|
| | श्रध्दांजलीमध्ये करण्यात यावा. तसेच सदर व्यक्तींच्या कुटुंबियांना पत्राने कळविण्यात यावे. यासाठी पत्राचा एकसमान मसुदा तयार करावा. | |
| बाब क्र. २२ | दूर व मुक्त अध्ययन संस्थेमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून Online Courses सुरू करणेबाबत. | दूर व मुक्त अध्ययन संस्था |
| ठराव | चर्चेच्या अनुषंगाने मा. कुलगुरूंनी सभागृहास अवगत केले की, NAAC मध्ये प्राप्त झालेल्या चांगल्या मानांकनामुळे दूर व मुक्त अध्ययन संस्थेसाठी एक चांगली संधी उपलब्ध झाली आहे, जसे की, दूर व मुक्त अध्ययन संस्थेमध्ये अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून Online Courses सुरू करता येतील. यासाठी दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे स्वत:चे technological platform असावे आणि ते अधिक सक्षम करण्यासाठी ताबडतोब प्रयत्न होणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार दूर व मुक्त अध्ययन संस्थेमधील कमीत कमी ५०% पदे भरण्याची मान्यता विद्यापरिषदेत अगोदरच मंजूर झालेली आहे. त्यानुसार ही प्रक्रिया लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. सदर दोन्ही प्रस्तावांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू